**जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या पाणी पुरवठा विभाग व उपविभागातील कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांच्या गोपनीय अहवालाबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्र.ग्रापापु-१०९८/प्र.क्र.१४४७/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक :- १७ ऑक्टोबर, १९९८**

**परिपत्रक :-**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी या विभागाच्या अधिपत्याखाली जिल्हा परिषदे अंतर्गत, स्वंतत्र पाणी पुरवठा विभाग व उपविभाग कार्यान्वीत करण्यात आले असून त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांची या पाणी पुरवठा विभागात व उप विभागात प्रतिनियुक्तीद्वारे नियुक्ती करण्यात येत आहे. जिल्हा परिषद अंतर्गत पाणी पुरवठा विभागात प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडील या कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांचे गोपनीय अहवाल लिहिण्या संबंधात खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

**कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा, जिल्हा परिषद :-**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अधिनस्त काम करीत असल्यामुळे, त्यांचे गोपनीय अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी लिहावेत. मात्र, गोपनीय अहवालासोबतचे तांत्रिक अहवाल अधिक्षक अभियंता तथा जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी यांनी लिहावेत. त्यानंतर गोपनीय अहवाल पुर्नविलोकनाकरिता प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे पाठविण्यात यावेत. प्रादेशिक मुख्य अभियंत्याने अहवाल पुर्नविलोकन करुन सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे जतन करण्यासाठी पाठवावेत.

**उप अभियंता, पाणी पुरवठा, जिल्हा परिषद :-**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, जिल्हा परिषद हे उप अभियंता पाणी पुरवठा यांचे गोपनीय अहवाल तांत्रिक भागासह लिहितील. ज्या जिल्हा परिषदेमध्ये पाणी पुरवठयासाठी स्वतंत्र विभाग नसेल, अशा जिल्हयांत उप अभियंत्याचे गोपनीय अहवाल संबंधित जिल्हयाचे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे लिहितील व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे पुर्नविलोकनासाठी पाठवतील. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी पुर्नविलोकन केल्यानंतर ते जतन करण्यासाठी प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे पाठवावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(रु. न. देशमुख)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
२) मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव
३) मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव
४) मा.अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय
५) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
६) सर्व विभागीय आयुक्त
७) सर्व जिल्हा परिषदेचे, मुख्य कार्यकारी अधिकारी
८) सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
९) सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१०) सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
११) सर्व कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
१२) सर्व उप अभियंता, पाणी पुरवठा व उप विभाग जिल्हा परिषद
१३) पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी
१४) पाणी पुरवठा विभागातील सर्व कार्यासन अधिकारी/कार्यासने
१५) निवडनस्ती (पापु ०७)

विजो/१६१०९८